# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

CIN: U45200MH1974SGC017206

पंजि. कार्या. : एफडीसीएम भवन, 359/ बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - 440 036.

E-mail: mdfdcmltd@gmail.com / gmhqngp12@gmail.com

दूरध्वनी क्र. 0712-2811965 / 2811963 / 2811962


---

क्रमांक:प्रशा/आस्था-१/प्र.क्र.१८/ ८०८ नागपूर, दिनांक :- 15 JUN 2021

आस्था

महाव्य 2 15/6/2021

## ज्ञापन

**विषय:- संपात सहभागी न होण्याबाबत.**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड या महामंडळातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागु करण्याचा आग्रह धरून महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटना या संघटनेकडील क्रमांक- ४८ दिनांक ०१/०६/२०२१ च्या पत्राद्वारे येत्या दिनांक १६/०६/२०२१ पासुन एफडीसीएम मधील अधिकारी व कर्मचारी हे कामबंद आंदोलन/अन्नत्याग सत्याग्रह करणार असल्याबद्दल निवेदन प्राप्त झाले आहे.

२.० या संदर्भात सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येते की, राज्य शासनातील शासकीय सेवकांप्रमाणे एफडीसीएम लि.च्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही सातवा वेतन आयोगाच्या तरतूदी लागु करण्याबाबत एफडीसीएमने सुरूवातीपासुनच सकारात्मक भुमिका घेतली आहे. या संदर्भात एफडीसीएमच्या संचालक मंडळाच्या दिनांक २६/०२/२०१९ रोजी झालेल्या सभेत विधीवत ठराव संमत झालेला असुन त्यानुसार दिनांक २७ फेब्रुवारी २०१९ च्या संदर्भान्वये राज्य शासनास औपचारिक प्रस्ताव सादर झालेला आहे. उक्त प्रस्तावास अनुसरून राज्य शासनाने कळविलेले आहे की, *"राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व सार्वजनिक उपक्रमांना ७ वा वेतन आयोग लागू करणे ही धोरणात्मक बाब असून सदर धोरण राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेने प्रथम निश्चित होणे आवश्यक आहे. ' वित्त विभागाकडून सर्व सार्वजनिक उपक्रमांकडून माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू असून याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरू आहे"*

३.० त्यानंतरही एफडीसीएममध्ये सातवा वेतन आयोगाची तरतूद लागु करण्याची बाब माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०५ एप्रिल २०२१ रोजी झालेल्या आढावा बैठकीत व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांचे निदर्शनास आणली आहे. यावरून स्पष्ट होते की, एफडीसीएममध्ये सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी महामंडळ तसेच शासन या दोन्ही पातळीवरून सहानुभूतीपूर्वक विचार सुरू आहे. असे असतांनाही महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटनेकडुन प्राप्त झालेले उपरोक्त निवेदन दुर्भाग्यपूर्ण आहे, असे नमुद करणे भाग पडते.

४.० एफडीसीएम मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे असेही निदर्शनास आणण्यात येते की, आजच्या घटकेत एफडीसीएमच्या अखत्यारीत सुमारे ३,४३,००० हेक्टर एवढे शासकीय वनक्षेत्र आहे. या विस्तीर्ण क्षेत्रावर उपलब्ध असलेले वन आणि वन्यजीव संपदेचे संरक्षणाची जबाबदारी महामंडळातील क्षेत्रिय कर्मचाऱ्यांवर आहे. उक्त प्रयोजनार्थ त्यांना भारतीय वन अधिनियम १९२७ खाली 'वन अधिकारी' म्हणून तसेच वन्यजीव संरक्षण (अधिनियम) १९७२ खाली 'वन्यजीव रक्षक' म्हणून घोषित करण्यात आले असुन व्यापक प्रमाणात वैधानिक शक्ती व अधिकार प्रदान करण्यात आलेली आहेत. 'वन अधिकारी' तसेच 'वन्यजीव रक्षक' या दोन्ही नात्यांने त्यांचेकडुन अपेक्षित कर्तव्य बजावण्यास कसुन झाल्याचे परिस्थितीत संबंधित अधिकारी/कर्मचारी फौजदारी प्रक्रियेस पात्र ठरतो. या व्यतिरिक्त भारतीय घटनेतील अनुच्छेद ५१-A (g) नुसार वने आणि वन्यजीव यांचे संरक्षण करणेही प्रत्येक भारतीय नागरीकांचे मौलिक कर्तव्य असुन उक्त कर्तव्यांचे वहन करणे प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांचे आद्य कर्तव्य ठरतात.

५.० मागिल सुमारे एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून COVID १९ या वैश्विक महामारीचा दुष्परिणाम जवळपास प्रत्येक गतिविधीवर पडत असुन या वैश्विक महामारीस तोड देण्याच्या दृष्टीकोणातून केंद्र व राज्य शासनाने काही सेवांना 'अत्यावश्यक सेवा' म्हणुन जाहीर केलेले असुन वानिकी गतिविधी त्यापैकी एक आहे. एकंदरित वानिकी क्षेत्रात COVID १९ वैश्विक महामारीस आवाहन देण्याची नैतिक जबाबदारी महामंडळावरही आलेली आहे. त्या दृष्टीनेही अशा विषम परिस्थितीत महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडुन संपात सहभागी होण्याची बाब निरर्थक ठरते.

६.० उक्त पार्श्वभूमित, याद्वारे आदेशित करण्यात येत आहे की, एफडीसीएमअंतर्गत कोणत्याही संवर्गातील अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संपात सहभागी झाल्यास किंवा कोणत्याही इतर अधिकारी व कर्मचाऱ्यास संपात सहभागी होण्यास प्रवृत्त करित असल्याचे आढळल्यास, असा अधिकारी व कर्मचारी वरिष्ठांच्या आदेशांची जाणीवपूर्वक अवहेलना (willful disobedience) करणारा गृहीत धरला जाईल व एफडीसीएमच्या सारग्रंथातील प्रकरण : ३, Employee's Conduct, Discipline And Appeal Rules या नियमावलीअंतर्गत शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरेल. तसेच संपामुळे एफडीसीएमच्या अखत्यारितील वनक्षेत्रात वन किंवा वन्यप्राणी संपदेस इजा झाल्यास, असे वनक्षेत्र ज्या अधिकारी/कर्मचाऱ्याच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे तो अधिकारी / कर्मचारी भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीव संरक्षण (अधिनियम) १९७२ मधील तरतूदीअंतर्गत फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरेल. संपामुळे वनसंरक्षण प्रभावित होण्याच्या स्थितीत महामंडळास कोणतेही आर्थिक नुकसान झाल्यास, संबंधित अधिकारी / कर्मचारी अशा आर्थिक नुकसानिच्या वसुलीस पात्र ठरेल. या व्यतिरिक्त संपात व्यतित केलेला कालावधी सर्व प्रयोजनार्थ सेवेत न व्यतित केलेला कालावधी म्हणून गृहित धरला जाईल आणि संपात व्यतित केलेला कालावधी हा अनधिकृत अनुपस्थिती म्हणुन गृहित धरला जाईल व सेवेत खंड (Break in service) असणारा कालावधी ठरेल, याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

७.० महाव्यवस्थापक तसेच प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व) यांनी सदरची बाब त्यांचे प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व संवर्गातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी तसेच ज्ञापनाची प्रत त्यांचे कार्यालयातील दर्शनी फलकावर लावावी. महाव्यवस्थापक (मुख्यालय) यांनी उक्त ज्ञापन या कार्यालयातील प्रमुख अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याची व्यवस्था करावी.

( एन. वासुदेवन )
व्यवस्थापकीय संचालक

प्रति,

१. महाव्यवस्थापक (मुख्यालय), एफडीसीएम लि.
२. महाव्यवस्थापक, नागपूर प्रदेश, नागपूर / प्रोदशिक व्यवस्थापक, चंद्रपूर प्रदेश, चंद्रपूर व नाशिक प्रदेश, नाशिक
३. विभागीय व्यवस्थापक, एफडीसीएम लि. (सर्व)

४. सहाय्यक व्यवस्थापक (सर्व) एफडीसीएम लि.
५. वनपरिक्षेत्र अधिकारी (सर्व) एफडीसीएम लि.
६. व्यवस्थापकीय संचालक कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी
७. एफडीसीएमच्या अधिकृत संकेत स्थळ www.fdcm.nic.in

प्रतिलिपी :

१. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
२. महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटना, नागपूर / चंद्रपूर